बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि १० ऑगस्ट २०२४**

## जेलराड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३६८/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४, मु. म का क ४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | मार्च २०२० ते दि. २७/०६/२०२४ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०८/२०२४ रोजी ०१.४३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अनिसा कुदरत कारभारी, वय- ३३ वर्षे, सध्या रा. फेज ३, अयोध्या नगर, हैद्राबाद रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) कुदरत कारभारी- पती, २) खाजाभाई कारभारी- सासरे, ३) अहिदा कारभारी- सासु, ४) जरिन- लहान नणंद, ५) रिजवाना- मोठी नणंद, सर्व रा. कविता नगर पोलीस लाईन, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी या सासरी असताना यातील नमुद आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस तु मला पसंद नाही, तु काळी आहे, तुला घरातील कामे निट येत नाही, तु आम्हाला रितीरीवाज केला नाही, असे म्हणून किरकोळ कारणावरुन मारहाण, शिवीगाळ, जिवे मारण्याची धमकी देवून उपाशी पोटी ठेवून, शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे. तसेच वकिलांमार्फत नांदण्यास नोटीस पाठविलेने फिर्यादी या सासरी नांदण्यास गेल्या असता तेथे आरोपीतांनी फिर्यादीस मारहाण करुन हाकलुन दिले आहे. तसेच दि. ०८/०८/२०२४ रोजी आरोपीत क्रं. १ यांनी फिर्यादीस पोस्टामार्फत तलाक नामा पाठविलेला आहे म्हणून. तपासः- पोसई- ढेरे- **८८३००६९२०१** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५१/२०२४ भा न्या सं क ३०९(६),३५२,३५१(२)(३),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०८/०८/२०२४ रोजी २३.३० वा चे सुमारास, भिमाशंकर नगर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०८/२०२४ रोजी १७.४३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सद्दाम मौला सिद्दीकी, वय- ३२ वर्षे, रा. ७१, भिमाशंकर नगर, मजरेवाडी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | सलमान, पुर्ण नाव पत्ता माहित नाही व तिन अज्ञात साथीदार |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे जेवण करुन घराबाहेर थांबले असता, आरोपीत मजकुर हे येवून फिर्यादीची गच्ची पकडुन शिवीगाळ करुन, खिशातील पैसे आणि मोबाईल काढुन दे असे म्हणाले. फिर्यादीने नकार दिला असता आरोपीने फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशात हात घालुन खिशातील ९,०००/- रु रोख व ओपो कंपनीचा हिरव्या रंगाचा मोबाईल काढुन घेतले. फिर्यादीने विरोध केला असता इतर तीन इसमांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. तेव्हा फिर्यादी हे आरडा ओरड करत असताना शेजारी राहणारे लोकांनी आरोपीची दहशत पाहुन दरवाजे बंद करुन घेतले तेव्हा आरोपीताने पाहणारे लोकांना उद्देशुन जर कोणी पोलीसात कंप्लेंट केली तर याद राखा कुणालाही जिवंत सोडणार नाही, तसेच फिर्यादीचे भावजी जमीर व बहिण शाहिन यांना धक्काबुक्की करुन पळुन गेले आहे म्हणून. तपासः- सपोनि- सोळुंखे- **९५५२२८५९००** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६१५/२०२४ भा द वि २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४,१३४(अ) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २६/०६/२०२४ रोजी १२.०० वा चे सुमारास, कंबर तलाव समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०९/०८/२०२४ रोजी ०१.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सोनाली आबरीश रोटले, वय- ३४ वर्षे, रा. १४०, पापाराम नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | एक अज्ञात बुलेटस्वार |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या दैनंदिन डयुटी करीता घरापासुन कंबर तलाव मार्गे जिल्हा रुग्णालय, गुरुनानक चौक, सोलापूर कडे मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी यु ३४५९ वरुन जात असताना नमुद ठिकाणी आले असता, मागुन एक अज्ञात इसम बुलेट वरुन भरधाव वेगाने, हयगयीने व रस्त्याचा अंदाज न घेता फिर्यादीस मागुन धडक देवून तेथुन निघुन गेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४९५ जमादार- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६१६/२०२४ भा द वि ४९८(अ),४९५,३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. १२/०९/२०१३ रोजी ते दि. १९/०३/२०२४ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०९/०८/२०२४ रोजी १४.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | कौशल्या प्रदिप वानखेडे, वय- ५० वर्षे, रा. ४३७, आंबेडकर नगर, ता. पो स्टे मागे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | प्रदिप वानखेडे, रा. टी सी कॉलेज, वसंत नगर, ऋतुजा अपार्टमेंट, दुसरा मजला, कांबळे बिल्डींग, बारामती |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या सासरी असताना याती नमुद आरोपीताने त्याचे पहिले लग्न झालेले असताना, फिर्यादीस न सांगता फिर्यादीसोबत दुसरा विवाह करुन तिला व्यवस्थित न नांदविता मोटार सायकल घेण्यासाठी १ लाख रुपये व दौंड येथे प्लॉट घेण्याकरीता ३ लाख रुपये मागणी करुन फिर्यादीला मारहाण, शिवीगाळ करुन नाहक मानसिक, शारिरीक त्रास देवून निघुन गेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४२१ इनामदार- ८६०५०१०१४१ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५५२/२०२४ भा द वि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०३/११/२०१९ रोजी पासुन ते दि. ०१/०८/२०२४ रोजी चे दरम्यान फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०९/०८/२०२४ रोजी १९.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | निशांत रियाज मासुलदार, वय- ३० वर्षे, रा. सध्या- ३२४, शनिवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) रियाज- पती, २) नसरिन- सासु, ३) हाजीमलंग- सासरे, ४) अजहर- दिर, ५) आयेशा- नणंद, सर्व रा. २१६, मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या सासरी असताना वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस दिल्या घरी नांदवु दिले नाही, फिर्यादी व तिचे वडीलांना ३-४ लाख रु ची मागणी केली व फिर्यादीस वेळोवेळी शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास दिला आहे व आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस न सांगता व परवानगी न घेता दुसरे लग्न करण्याकरीता प्रवृत्त केले आहे म्हणून. पोहेकॉ/ ५८७ पवार- ९८२३३५४०४८ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६१७/२०२४ भा न्या स क ३०५,३३१(३),३३१(४) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०७/०८/२०२४ रोजी ०७.०० वा ते दि. ०९/०८/२०२४ रोजी ०६.२० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०९/०८/२०२४ रोजी २२.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | छगनराव रामचंद्र व्हनमाने, वय- ७५ वर्षे, रा. १५, शास्त्री सहकारी गृहनिर्माण संस्थ मर्यादीत, सिव्हील लाईन, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | ७१,६००/- रु त्यात रोख रक्कम ४०० ग्रॅम चांदचे करंडक, मुर्ती, भेटवस्तु व ४ घडयाळ असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे मुख्य दरवाजाचे लोखंडी सेप्टी दरवाजाची कडी व मुख्य लाकडी दरवाजाची कडी कशानेतरी उचकटुन, दरवाजा उघडुन आत प्रवेश करुन, हॉलमधील कपाटातुन नमुद वर्णनाचे व किंमतीचे रोख रक्कम व ऐवज फिर्यादीचे संमतीवाचून चोरी केला आहे म्हणून. तसेच सोसायटीमधील निनाद बाळकृष्ण बुलबुले यांचे बंद घराचा दरवाजा तोडुन आत प्रवेश करुन चोरी केली आहे म्हणून. तपासः- पोसई- शिंदे- **९६८९५९७११६** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४४१/२०२४ भा न्या सं क १०३,२३८,३०९(६),६१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २७/०७/२०२४ रोजी १५.०० वा चे सुमारास, तरटीनाका, सोलापूर ते पुणे सोलापूर हायवे वरील सिनानदी ब्रीज लांबोटी, सोलापूर दरम्यान |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १०/०८/२०२४ रोजी ०५.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | पोसई- नागेश रामदास येळे, नेम- जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) दिपक साळुंखे, वय- ४० वर्षे, रा. जय मल्हार नगर, बाळे,सोलापूर<br>२) विधी संघर्षग्रस्त बालक |
| **मयताचे नाव** | **:** | साळुबाई नागेश वाघमोडे, वय- ६० वर्षे, रा. ७८, स्वागत नगर, एमआयडीसी, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील महिला नामे साळुबाई नागेश वाघमोडे, वय- ६० वर्षे, यांना आरोपीत क्रं. १ व याने त्याचे सोबत आरोपीत क्रं. २ यांनी रिक्षा क्रं. एम एच १३ सी टी ५४८२ या मध्ये बसवुन घेवून जावून जात असताना सदर रिक्षा मध्ये आरोपीत क्रं. १ याने चोरी करुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने महिला नामे साळुबाई वाघमोडे हिचा गळा हाताने दाबुन तिला जिवे ठार मारले व तिचे अंगावरील सोन्याचे दागिने काढुन घेतले. तसेच तिचा मृतदेह हा रिक्षा मधुन आरोपीत क्रं. २ याचे सोबत पुणे सोलापूर हायवे वरील लांबोटी येथील सिना नदी पुलावर जावून पुरावा नष्ट करण्यासाठी सदर महिलेचा मृतदेह हा सिना नदी पुलावरुन खाली नदीच्या वाहत्या पाण्यात फेकुन दिला. तसेच आरोपीत क्रं. १ व २ यांनी संगनमत करुन चोरी करण्याच्या उद्देशाने तिचा गळा आवळुन तिचे तोंडा स्कार्प कोंबुन इच्छापुर्वक तिस जिवे ठार मारले आहे म्हणून. तपासः- वपोनि- चव्हाण- ८१०८१०२००३ |